अति.नगर अभियंता (प्रकल्प) कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जावक क्रः–
दिनांक :–

मा.जनता संपर्क अधिकारी,
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस.. .. ..

विषय :– मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम ६० (अ) (३) अन्वये जाहिर करावयाची इकडील कार्यालयाकडील माहिती.

विषयांकीत प्रकरणी इकडील कार्यालयाकडील माहिती खालीलप्रमाणे :–

| अ.क्र. | कलम ६० (अ) (३) | माहिती |
|---|---|---|
| १ | महानगरपालिकेचा तपशिल | सामाईक तपशिल आहे. |
| २ | महानगरपालिकेची कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी किंवा तिला सल्ला देण्यासाठी घटित करण्यात आलेली कोणत्याही नावाने संबोधली जाणारी मंडळे, परिषद, समित्या व इतर निकय दर्शविणारे विवरणपत्र मग त्या मंडळाच्या, परिषदाच्या, समित्याच्या व इतर निकायांच्या बैठकी जनतेसाठी खुल्या असोत किंवा नसोत अथवा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध असोत किंवा नसोत. | विविध समिती व विषयपत्र इ. बाबतची माहिती नगर सचिव विभागाशी संबंधीत आहे. |
| ३ | तिच्या अधिका–यांची व कर्मचा–यांची निर्देशिका | सोबत जोडले आहे. |
| ४ | महानगरपालिकेच्या कोणत्याही कामाकरिता सवलती, परवानगी किंवा प्राधिकारपत्र देण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिका–यांचे तपशिल. | मा.महापालिका आयुक्त कार्यालयाकडील परिपत्रक जा.क्र. मआ/अति.म.आ.(वि) दि. २५.०२.२००९ नुसार<br>सोबत जोडले आहे. |
| ५ | प्रत्येक तिमाहीनंतर दोन महिन्यांच्या आत त्या तिमाहीचा लेखापरिक्षित टाळेबंद जमा व खर्च आणि पैशाचा ओघ (कॅश फ्लो ) दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र, आणि वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याच्या आत संपूर्ण वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण वित्तीय विवरणपत्र. | मुख्यलेखापाल कार्यालयाशी संबंधीत. |
| ६ | महानगरपालिका पुरवत असलेल्या सर्व सेवा दर्शविणारे विवरणपत्र. | सोबत जोडले आहे. |
| ७ | सर्व योजनांचे तपशील, प्रस्तावित खर्च, पुरविण्यात आलेल्या प्रमुख सेवासाठी किंवा पार पाडलेल्या कामांसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च आणि सवितरित केलेल्या रकमांबाबतचा अहवाल. | सोबत जोडले आहे. |
| ८ | महानगरपालिकेने पुरविलेल्या प्रमुख सेवासाठीच्या किंवा पार पाडलेल्या कामांसाठीच्या अर्थसहाय | निरंक |

| | | |
|---|---|---|
| | कार्यक्रमाचा तपशील आणि अशा कार्यक्रमांसाठीचे लाभार्थी निश्चित करण्यासाठी रित व निकष | |
| ९ | महानगरपालिका क्षेत्राच्या विकासाशी संबंधित बृहत योजनेचा, शहर विकास योजनेचा किंवा इतर कोणत्याही योजनेचा तपशिल | मेट्रो प्रकल्प व बी.आर.टी. तपशिल सोबत जोडला आहे. |
| १० | राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, निदिष्ट करेल असे, प्रमुख बांधकामांचे तपशील, तसेच बांधकामाचे मूल्य, पूर्ततेचा कालावधी आणि कराराचा तपशिल याबाबतची माहिती. | निरंक |
| ११ | महानगरपालिका निधिचा तपशिल म्हणजेच मागील वर्षामध्ये पुढील बाबीद्वारे मिळालेले उत्पन्न | पे ॲण्ड पार्क :–र.रू. ४३.०० लक्ष |
| अ | कर,शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लापरून व परवानगी यातून मिळणारी फी | निरंक |
| ब | वसूल न केला गेलेला कर, शुल्क, उपकर अणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यातून मिळणारी फी आणि वसूली न करण्यामागची कारणे. | निरंक |
| क | राज्य शासनाने वसूल केलेल्या महानगरपालिकेकडे हस्तांतरित केलेला हिस्सा आणि महानगरपालिकेला मिळालेली अनुदाने | बी.आर.टी. योजना अनुदान :– २०% अनुदान |
| ड | महानगरपालिकेला नेमून दिलेल्या किंवा तिच्याकडे सोपविलेल्या योजना, प्रकल्प व आराखडे यांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने दिलेले अनुदाने, त्यांचे स्वरूप आणि विनियोगाची मर्यादा. | मेट्रो प्रकल्प योजना टिपणी सोबत जोडली आहे. |
| इ | जनतेकडून किंवा अशासकीय अभिकरणाकडून मिळालेल्या देणग्या किंवा अंशदाने कामामार्फत उभा केलेला पैसा | निरंक |
| १२ | प्रत्येक प्रभागाला नियतवाटप केलेली वार्षिक अर्थसंकल्पीय तरतुद | मुख्यलेखापाल कार्यालयाकडे एकवट माहिती आहे. |
| १३ | विहित करण्यात येईल अशी इतर माहिती | पे ॲण्ड पार्क योजना, मेट्रो डि.पी.आर. सी.एम.पी. अहवाल पुणे मनपा वेबसाईटवर आहेत. |

मा.स.कळावे,

अति.नगर अभियंता (प्रकल्प)
पुणे महानगरपालिका

## पुणे बी.आर.टी. पायलट प्रोजेक्ट :–

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नगर पुनर्निर्माण अभियाना अंतर्गत केंद्र शासनाने पुणे शहरासाठी बस रॅपिड ट्रान्झीट सिस्टीम (बी.आर.टी.) हा प्रकल्प मंजूर केला आहे. या योजने अंतर्गत केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून निधी उपलब्ध होत असून केंद्र शासनाने पहिल्या व दुसरा टप्पा मिळून एकुण र.रू. १०३.२१ कोटी मंजूर केले आहेत. यामध्ये केंद्र शासनाचा ५० टक्के, राज्य शासनाचा २० टक्के तर पुणे महानगरपालिकेचा ३० टक्के आर्थिक वाटा असणार आहे.

केंद्र शासनने मंजूर केलेल्या या बी.आर.टी. प्रकल्पात पुणे सातारा रोड व पुणे सोलापूर रोड या दोन राष्ट्रीय महामार्गावर कात्रज–स्वारगेट–हडपसर गाडीतळ पर्यंत असा एकूण १७.० कि.मी. रस्त्याच्या दरम्यान पायलट प्रोजेक्ट करण्यात आला आहे. या १७.० कि.मी. मधील अंदाजे २.४ कि.मी. एवढा भाग कॅन्टोमेंट हद्दीत येत असून ती जागा पी.डब्ल्यू.डी. च्या ताब्यात होती. पुणे मनपासाठी इ.एम.टी.सी., दिल्ली या संस्थेने बी.आर.टी.चे सर्व डिझाईन व नकाशे केले असून बी.आर.टी. मार्गावर प्रकल्पामध्ये सातारा रस्ता व सोलापूर रस्ता येथे सहा वेगवेगळया ठिकाणी बस टर्मिनल विकसित करणेत आलेली आहेत. त्यामध्ये कात्रज–राजीव गांधी प्राणी संग्रहालय, कात्रज दूध डेअरी व स्वारगेट येथे बस टर्मिनन्सवरती नागरीकांसाठी पार्किंगची सुविधा ही करण्यात आलेली आहे.

सदरचे बी.आर.टी. प्रकल्पामध्ये बस लेन ३.५० मी.च्या दोन रस्त्याच्या मध्यभागी करण्यात आलेल्या असून, त्याच्या दोन्ही बाजूस (डाव्या व उजव्या बाजूस ) इतर वाहनांसाठी संचलनास ७.०० मी. रूंदीचे स्वतंत्र मार्ग तयार करण्यात आलेला आहे. हे करण्यासाठी पॉलिमर कॉंक्रीट ब्लॉक, प्लास्टीक टयुबुलर कोन, कॉंक्रीटचे लेन कटर बिम इ. स्वरूपाचे बांधकाम करून स्वतंत्रमार्ग करण्यात आलेले आहेत. त्याच्या दोन्ही बाजूस रस्ता सुशोभिकरणा करिता छोटी रोपे लावण्यात आलेली आहेत. त्यामध्ये कॉंक्रीट फाउंडेशनवरती डेकोरेटीव विद्युत पोल लावण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे दोन्ही बाजूस २ ते २.५० मी. चे सायकलस्वारांसाठी स्वतंत्र सायकल मार्ग निर्माण करण्यात आलेले आहेत. तसेच सायकलमार्गाला लागून १.५० ते ३ मी. रूंदीचे पायी चालणारे पादचा–यांसाठी स्वतंत्र फुटपाथ तयार करण्यात आलेले आहेत. आणि त्याच्या बाजूस आवश्यक तेथे सर्व्हिस रस्ते ही निर्माण करण्यात आलेले आहेत.

सदर मार्गावर एकूण २६ चौक असून त्या ठिकाणी सिग्नल व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच बस थांब्यांच्या ठिकाणी बी.आर.टी.स आवश्यक असे बस शेल्टर्स निर्माण करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये पी.आय.एस. म्हणजे येणा–या व जाणा–या बसेस त्यांचे क्रमांक व वेळ कळण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सदर मार्गावर भारती विद्यापीठ येथील भुयारी मार्गाचा वापर बी.आर.टी.साठी करणेकरिता त्यामध्ये स्थापत्य विषयक आवयश्यक ते बदल करून त्याचा वापर सुरू करण्यात आलेला आहे. तसेच चैतन्य नगर धनकवडी येथे नागरीकांना रस्ता ओलांडण्यासाठी लोखंडी उड्डाणपूल बी.ओ.टी. तत्वावर बांधण्यात आलेला आहे. तसेच रामटेकडी जवळील किर्लोस्कर न्युमॅटिक कंपनी जवळ रेल्वे उड्डाणपूलाचे १५.०० मी. ने रूंदीकरण करून त्यामध्ये एक नव्याने ग्रेड सेपरेटर तयार करण्यात आलेले आहे.

बी.आर.टी.प्रकल्पामध्ये भाग २ चे र.रू. ६७ कोटीचे काम जानेवारी २००८ मध्ये सुरू करून सदर कामामध्ये यु.एम.टी.सी. अर्बन मास ट्रान्सिट कंपनी, दिल्ली यांनी दिलेल्या बी.आर.टी. सुधारित नकाश्याप्रमाणे नविन फुटपाथ, कॉंक्रीटचे सायकल ट्रॅक, स्ट्रिट लाईट, साईन बोर्ड, थर्मोप्लास्टिक पेंट, स्ट्रीट फर्निचर इ. कामे करण्यात आलेली आहेत. जून २००९ पर्यंत न्यायालयीन दाव्यात अडकलेली कामे वगळता ९८% कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

| विषय | पथदर्शी बी.आर.टी.प्रकल्प राबविण्या पूर्वीची स्थिती | पथदर्शी बी.आर.टी. प्रकल्प राबविल्या नंतरची स्थिती |
|---|---|---|
| अपघात | १९० सरासरी दर साल | १५१ सरासरी दर साल |
| बस फे–यांची संख्या | २०० दररोज | २७२ दररोज |
| वाहतुकीचा सरासरी वेग | ८ कि.मी.प्रति तास | १४ कि.मी.प्रति तास |

<u>योजनेचे फायदे:–</u>

सार्वजनिक बसच्या कार्यपध्दतीत सुधारणा,

स्वतंत्र सायकलमार्ग व पादचारी मार्गांमुळे सुरक्षित वाहतुक,

स्वतंत्र बसमार्गामुळे प्रवास वेळेत बचत

आकर्षक बसथांबे, चिन्हे व आय.टी.एस. इ.मुळे आकर्षक व सुरक्षित प्रवास.

हातगाडी, फेरीवाले यांचे रस्त्यावरील अतिक्रमणामध्ये घट.

या मार्गावरील वाहतुक कोंडी कमी झाल्याने या मार्गाच्या परिसरातील प्रदुषणामध्ये घट

# पुणे मेट्रो प्रकल्प सद्यस्थिती

१) पुणे महानगर क्षेत्रातील वाहतुक समस्या निराकरणाचा एक पर्याय म्हणून पुणे मेट्रो रेल प्रकल्प प्रस्तावित करण्यात आलेला आहे. पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास आणि त्यामधील पुणे मनपाचा आर्थिक सहभाग तसेच राज्य व केंद्र शासनाकडून प्रकल्प अनुदान, कर्ज उभारणी व परत फेड इ. बाबीस मा.स्थायी समिती ठराव क्र.१४३९ दि. १९.०१.२०१० मार्फत व मा.मुख्य सभा ठराव क्र.४१६ दि.२७.०१.२०१० नुसार मान्यता प्राप्त झालेली आहे. या प्रकल्प अहवालानुसार मेट्रो रेल्वे करिता दोन मार्ग प्रस्तावित केलेले आहेत. त्यापैकी मार्ग क्र.१ पिंपरी चिंचवड ते स्वारगेट हा १६.५८९ कि.मी. असून, त्यापैकी पुणे मनपा हद्दीतून ९.८८५ कि.मी. व पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतून ६.७०४ कि.मी. असा मार्ग प्रस्तावित आहे. मार्ग क्र. २ हा वनाझ ते रामवाडी हा १४.९३ कि.मी. असून, हा पूर्णपणे मनपा हद्दीतून प्रस्तावित करण्यात आलेला आहे. हा प्रकल्प पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये संयुक्तिकरित्या राबविणेचा होता. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन या सल्लागार संस्थेकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घेण्यात आलेला आहे.

२) सदर प्रकल्प अहवालास मान्यता मिळणेसाठी आणि राज्य शासनाने त्यामधील २०% सहभाग मान्य करून मेट्रो प्रकल्प अहवाल केंद्र शासनाकडे त्यांचे हिस्साचे २०% अनुदान तसेच कर व अधिभार सवलतीसाठी राज्य शासनाच्या शिफारशीसह केंद्र शासनाकडे पाठविण्यासाठी पुणे महानगरपालिकेने जा.क्र. मआ/अशा क्र. ३० दि. ०४.०२.२०१० रोजी महाराष्ट्र शासनाकडे सादर केलेला आहे.

३) या प्रकल्पामध्ये पुणे मनपाचा ५ % व पिंपरी चिंचवड मनपाचा ५ % असा प्राथमिक आर्थिक उभारणी सहभाग होता. सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने त्यांच्या कार्यक्षेत्रात येणा-या मेट्रो प्रकल्पास मान्यता देणेबाबत अद्याप निर्णय घेतलेला नाही. त्याचप्रमाणे या प्रकल्पामधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सहभाग व आर्थिक हिस्सा त्याचप्रमाणे आर्थिक हिस्सा हा मार्गाच्या लांबीवर किंवा महापालिका क्षेत्रातील प्रवाशांच्या संख्येवर याबाबतचा कोणताही निर्णय पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने अद्याप घेतलेला नाही. या पार्श्वभूमिवर पुणे मनपाने मार्ग क्र. २ करिता जो पूर्णतः पुणे मनपाच्या क्षेत्रामध्ये आहे त्याकरिता प्रकल्प खर्चाच्या १०% पुणे मनपामार्फत आर्थिक सहभाग म्हणून अंदाजपत्रकीय तरतुद करणे आवश्यक ठरत आहे.

पिंपरी चिंचवड मनपाने अद्याप पुणे महानगर मेट्रो रेल्वे प्रकल्पाबाबत निर्णय न घेतल्याच्या पार्श्वभूमिवर डि.एम.आर.सी.मार्फत प्रस्तावित करण्यात आलेल्या मेट्रो रेल्वे प्रकल्प मार्गापैकी पुणे महानगरपालिका क्षेत्रातुन जाणारा वनाझ ते रामवाडी या मार्गावरील मेट्रो रेल्वे प्रकल्प राबविणे शक्य आहे. मेट्रो मार्ग क्र.२ वनाझ ते रामवाडी हा पुर्णतः जमिनीच्या वरच्या पातळीवरून (Elevated) प्रस्तावित करण्यात आलेला आहे. आर्थिक उभारणी पर्याय, त्याचप्रमाणे जमिनीची उपलब्धता, प्रवाशांची संख्या इ. बाबींचा विचार करून मेट्रो मार्ग क्र.२ हा पुणे विमानतळापर्यंत व नगर रस्त्यावर खराडी पर्यंत / चंदननगर पर्यंत वाढविता येणे शक्य आहे.

या अनुषंगाने खालील बाबीस मा.मुख्य सभा ठराव क्र. ९० दि. २३.०६.२०१० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

१. या पूर्वी मा.मुख्य सभा ठराव क्र. ४१६ दि. २७.०१.२०१० अन्वये मान्य मेट्रो प्रकल्पातील एका टप्प्याची म्हणजेच वनाझ ते रामवाडी दरम्यान मेट्रो रेल्वे प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू करणेस.
२. वनाझ ते रामवाडी या दरम्यान असलेला मेट्रो मार्ग हा जमिनीची उपलब्धता, आर्थिक गुंतवणुक पर्याय व प्रवाशांची संख्या इ. बाबींचा विचार करून आवश्यकतेनुसार विमानतळापर्यंत व नगर रस्त्यापर्यंत / चंदननगर पर्यंत वाढवून त्याची अंमलबजावणी करणेस.

३. या पूर्वी मा.मुख्य सभा ठराव क्र. ४१६ दि. २७.०१.२०१० अन्वये मान्य केल्यानुसार ५% तरतुदी ऐवजी पुणे महानगरपालिका क्षेत्रात करण्यात येणा–या वनाझ ते रामवाडी दरम्यानच्या मेट्रो रेल्वे मार्गाकरिता १०% इतकी तरतुद अंदाजपत्रकीय तरतुदीमधून करणेस.

(४) वनाझ ते रामवाडी दरम्यान पुणे मनपा हद्दीतील मेट्रो प्रकल्पास मे. महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळणेसाठी अशा/मआ/पत्र क्र.२४ दि. २८.०६.२०१० अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

| प्रकल्प खर्च | मार्ग २ | (मार्ग १) | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| सन २००९ च्या दराने व भूसंपादनासह प्रकल्प खर्च | र.रू.१९४८ कोटी | र.रू. ४०५० कोटी | र.रू.५९९८ कोटी |
| सन २००९ च्या दराने, भूसंपादन व केंद्र व राज्य सरकार करासह प्रकल्प खर्च | र.रू. २२९४ कोटी | र.रू. ४७९६ कोटी | र.रू. ७०९० कोटी |
| प्रकल्प पूर्णत्वाचा सन २०१४ पर्यंतचा करासहीत व भूसंपादन सह खर्च | र.रू. २५९३ कोटी | र.रू. ५३९१ कोटी | र.रू. ७९८४ कोटी |

| तपशील | आर्थिक खर्चातील हिस्सा | एकूण निधी |
|---|---|---|
| पुणे महानगरपालिकेचा आर्थिक सहभाग (अर्थसकल्पीय तरतूदीद्वारे) | १०% | २५९.३० |
| राज्य सरकार अनुदान / हिस्सा | २०% | ५१८.६० |
| केंद्र सरकार अनुदान / हिस्सा | २०% | ५१८.६० |
| अन्य स्त्रोत | ५०% | १२९६.५० |
| एकूण | १००% | २५९३.०० |

| अ.क्र. | हुद्दा | नाव | कार्यालयाचा पत्ता |
|---|---|---|---|
| १. | अति.नगर अभियंता (प्रकल्प) | श्री.श्रीनिवास बोनाला | अति.नगर अभियंता (प्रकल्प) कार्यालय, पुणे महानगरपालिका, १ला मजला. |
| २ | कार्यकारी अभियंता | श्री.कडोलकर | अति.नगर अभियंता (प्रकल्प) कार्यालय, पुणे महानगरपालिका, १ला मजला. |
| ३. | उप अभियंता | १.श्री.खोत | |
| | | २. श्री.अमर शिंदे | |
| | | ३.श्री.संजय कुलकर्णी | |
| ४ | कनिष्ठ अभियंता | १.श्री.फटाले | |
| | | २.श्री.सोनवणे | |
| | | ३.श्री.कदम | |
| | | ४. श्री. इंगळे | |
| | | ४. श्री.राकेश शिंदे | |
| | | ५. श्री.पोफळे | |
| | | ६.श्री. पवार | |
| ५ | आरेखक | श्री.राहूल माळी | |
| ६ | अनुरेखक | १.श्री.उमेश काळे | |
| | | २. श्री. शैलेंद्र भालेराव | |
| ७ | ज्युनिअर ग्रेड लेखनिक | १.श्रीमती रोकडे | |
| ८. | मोकादम | १.श्री.मोरे | |
| | मोकादम | २.श्री.तिकोणे शशिकांत विठ्ठल | |
| ९ | मिस्त्री | श्री.काकडे दत्तात्रय भागुजी | |
| १० | गवंडी | श्री.जावळकर कैलास सोपान | |
| ११ | शिपाई | १. श्रीमती विटकर | |
| | | २. श्री. लेंभे | |
| ११. | बिगारी | १. श्रीमती कटके | |
| | | २. श्री.वरे | |
| | | ३.श्री.पारखी | |
| | | ४.श्री.जाधव | |
| | | ५.गायकवाड | |
| | | ६.धनगर रामप्पा ल. | |
| | | ७. भवारी विष्णू बुधा | |
| | | ८. पाटोळे यशोदाबाई | |
| | | ९. रायकर सुरेश हरिभाउ | |
| | | १०. वांजळे विजय बबन | |
| | | ११. लोंढे कृष्णा शंकर | |
| | | १२. खंडाळे रमेश ना. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १३. वाडेकर प्रकाश वि. | |
| | | १४. काबदुले सुरेश महादु | |
| | | १५. पवार केदार मारूती | |
| | | १६. कोंढरे रामदास बबन | |
| | | १७. आगले बाळू अर्जून | |
| १२ | ड्रायव्हर | गायकवाड श्रीपती क. | |
| १३ | पेंटर | सतिश प्रल्हाद दुधाळ | |

# वाहतुक नियोजन विभाग

<u>खात्याचा उद्‌देशः-</u>

शहारातील वाढती लोकसंख्या व वाहनांची संख्या विचारात घेता वाहतुक समस्या निराकरण करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, वाहतुक सुरळीत व सुरक्षित होण्यासाठी आवश्यक त्या उपाय योजना राबविणे याकरिता सुनिश्चित दिशा ठरविण्यासाठी वाहतुक नियोजन विभाग, पुणे मनपामध्ये स्वतंत्रपणे कार्यरत करण्यात आलेला आहे.

<u>खात्याचे उद्‌दीष्ट :-</u>

१. केंद्र शासनाच्या शहर वाहतुक धोरणा अंतर्गत बाबींची अंमलबजावणी करणे.

२. शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीत करण्यासाठी उपाय योजना राबविणे

३. शहरातील वाहतुक व्यवस्थेबाबत अभ्यास करून शहरासाठी वाहतुक सुधारणा आराखडा व अनुषंगिक अहवाल तयार करणे.

४. वरिल प्रमाणे अहवाल मा.महानगरपालिकेची मान्यता घेवून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे.
   अ. निधी उभारणे
   ब. टप्पे निहाय आराखडा तयार करणे
   क. अंदाजपत्रकात तरतूद करणे.
   ड. प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे.

५. विकास आराखडयातील पार्किंग आरक्षणाच्या ठिकाणी व अन्य योग्य त्या जागी पार्किंग संकुले विकसित करणे.

६. वाहतुक सक्षमिकरण अंतर्गत विशेष प्रकल्प योजना राबविणे. (उदा. बी.आर.टी. पथदर्शी प्रकल्प)

७. वाहतुक पोलीस विभागाकडील सूचना नुसार तसेच पोलीस विभागाचे अभिप्रायानुसार वाहतुक व्यवस्थेमध्ये आवश्यक ते बदल करणे.

## <u>वाहतुक नियोजन विभागाचे कामकाजाचे स्वरूप व कार्यप्रणाली.</u>

१. वाहतुक कोंडीच्या ठिकाणी ट्रॅफिक सिग्नल यंत्रणा, पोलीस विभागाच्या अभिप्रायानंतर उभारणे, सुधारणा करणे, देखभाल दुरूस्ती करणे.

२. अंदाजपत्रकामधील तरतुदीनुसार भुयारीमार्ग, पादचारी मार्ग इ. विकास कामे करणे

३. नव्याने तयार करण्यात आलेल्या अथवा अस्तित्वातील रस्त्यावर डिव्हायडर बांधणे, मुख्य रस्त्यास मिळणा-या अन्य रस्ते त्यामध्ये ठेवण्यात येणारे ओपनिंग इ. बाबत वाहतुक पोलीस विभागाचा अभिप्राय देवून सदर कामे करण्यात येतात.

४. चौक सुधारणा करणे- यामध्ये चौकामध्ये वळणाकार भाग पुर्णतः रूंद करणे, आवश्यक ते रूंदीचे फुटपाथ करणे, डिझाईन नुसार व आवश्यकतेनुसार चौक मध्यभागी आयलॅण्ड उभारणे इ. कामे करण्यात येतात.

५. बहुमजली पार्किंग आरक्षणे विकसित करणे - मान्य विकास आराखडयामध्ये दर्शविण्यात आलेली पार्किंग आरक्षण / बसस्थानके/ ट्रक टर्मिनस इ. विकसन करणे आवश्यक ते नुसार व डिझाईननुसार आर.सी.सी. बहुमजली पार्किंग तसेच मॅकेनिकल कार पार्किंग इ. विकास कामे करण्यात येतात.

६. लेन मार्किंग करणे / झेब्रा क्रॉसींग मार्किंग/ पार्किंग - नो पार्किंग करिता पट्टे आखणे - या अंतर्गत (रस्त्याची रूंदी, रस्त्यावरील चौक, रस्ते ओलांडण्याची ठिकाणे, सिग्नल इ. बाबींचा विचार करून आवश्यक तेथे वाहतुक पोलीस विभागाचा अभिप्राय घेवून कामे करण्यात येतात. )

७. स्पीड ब्रेकर्स / रेलिंग/पार्किंग बोर्ड लावणे इ. कामे – वाहतुक पोलीस विभागाच्या अभिप्रायानुसार आवश्यक त्या ठिकाणी स्पीड ब्रेकर्स रेलिंग बसविणे, पार्किंग बोर्ड लावणे ची कामे विहीत मानकानुसार संबंधित क्षेत्रिय कार्यालयामार्फत करण्यात येतात. जेष्ठ नागरीकांसाठी रस्ते, क्रॉसींग योजना राबविण्यात येते.

८. रस्त्यांना / चौकांना, नाव समितीची मान्यता घेवून, नावे देणे अंतर्गत फलक बसविणे तसेच रस्त्यावर सुचनात्मक फलक आवश्यकतेनुसार बसविणे.

९. बी.आर.टी. पथदर्शी प्रकल्प वाहतुक नियोजन विभागामार्फत राबविणेत आलेला असून, त्या अंतर्गत देखभाल दुरूस्तीची कामे करण्यात येतात.

१०. रस्त्यावर पे ॲण्ड पार्क योजना राबविणे – मा. स्थायी समितीची मान्यता घेवून शहरातील विविध रस्त्यावर वाहने उभी करण्यासाठी शुल्क आकारणी म्हणून पे ॲण्ड पार्क योजना राबविणेत येते.

अ. सर्व प्रकारची विकास कामे ही उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतुदी नुसार करण्यात येतात. देखभाल व दुरूस्ती अंतर्गत कामां व्यतिरिक्त अन्य सर्व कामांसाठी वाहतुक सर्व्हे करण्यात येतो व तद्नंतर डिझाइन करण्यात येते.

ब. र.रू. १०.०० लक्ष आतील कामे, स्पीड बेकर्स, लेन मार्किंग, सम विषम तारखेचे पार्किंग बोर्ड बसविणे ही सर्व कामे क्षेत्रिय कार्यालयामार्फत करण्यात येतात.

क. सर्व प्रकारच्या कामांसाठी त्या त्या आर्थिक वर्षाच्या मान्य शेडयुल दरानुसार पुर्वगणनपत्रक तयार करून निविदा मागविण्यात येतात. निविदेच्या रक्कमेनिहाय आवश्यक ती प्रशासकीय मान्यता घेण्यात येते. मोठया स्वरूपाच्या प्रकल्पाकरिता तज्ञ सल्लागारांची नेमणुक निविदा मागवून करण्यात येते अथवा मनपा पॅनेलवरील सल्लागारांची नेमणूक करण्यात येते.

ड. खात्यामार्फत सर्व विकास कामांवर देखरेख करण्यात येते.